**साक्षीदाराचे नाव – रिध्दी गणेश वाटवे,**

**वय – २० वर्षे,**

**व्यवसाय– शिक्षण,**

**रा. मौजे–नडवली, ता.रोहा, जि.रायगड.**

**अर्ज निशाणी क्र.२८ वरील आदेशाप्रमाणे साक्षीदाराचा पुरावा गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्रीमती एम.व्ही.मोरे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

०१. मी सध्या महाड येथील महाविद्यालयामध्ये बी.एस.सी अॅग्रीकल्चर अंतीम वर्ष शिक्षण घेत आहे. माझे घरी मी, माझा भाऊ, आई व आईची आई असे मिळून राहते. आम्ही सर्व मुंबईला राहतो. माझे काही शिक्षण नडवली येथे झाले आहे. तेथे दोन घरे असून एका घरामध्ये माझे आजी–आजोबा राहतात व दुस–या घरामध्ये मी, भाऊ, आई व पप्पा रहायचो.

०२. दिनांक २३/०३/२०२० रोजी कोरोना विषाणूमुळे ताळेबंदी लागू झाली होती. त्यापूर्वी माझे आईने माझ्या पप्पांविरुध्द प्रस्तुतचे प्रकरण न्यायालयात दाखल केले होते. प्रस्तुत केस दाखल झाल्यानंतर माझे आई–वडिलांमध्ये भांडणे वाढली. त्यावरुन माझे पप्पा नोकरी निमित्ताने महाड येथे राहण्यास गेले. माझे पप्पा व आजोबा देखील आमचे सोबत बोलत असत.

०३. कोरोना काळातील ताळेबंदी दरम्यान माझे पप्पा, माझे आजोबांकडे मला देण्याकरीता म्हणून पैसे देत नसत व त्यासोबत ते चिठ्ठी देखील देत नसत. आता मला दिनांक ०३/०८/२०२० व दिनांक ०६/१०/२०२० रोजीच्या दस्तऐवज यादी **निशाणी क्र.४२** खाली दाखल पावत्या दाखविण्यात आल्या. त्यात नमूद हस्ताक्षर माझे वडीलांचे आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही.

**साक्षीदार गैरअर्जदाराचे कथनास समर्थन करीत नसल्याने गैरअर्जदाराचे विद्वान विधिज्ञांनी तिला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी**

<u>**देण्यात आली.**</u>

०४. कोरोना कालावधीमध्ये आमचे उदनिर्वाहाकरीता माझ्या आईने तिचे सोने गहाण ठेवले होते. कोरोना कालावधीचे दोन वर्षादरम्यान माझी आई अॅडजेस्ट करायची.

सरतपासणी पूर्ण.

**अर्जदारातर्फे विधीज्ञ श्रीमती के.डी.मोरे यांनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्यास नकार दिला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्थळ : रोहा.
दि.२२.०२.२०२४.

–––सही–––
(एस. एस. महाले)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.

(डिजीटल स्वाक्षरीची मुदत संपल्यामूळे प्रस्तुतचा दस्त डीजीटल स्वाक्षरीने सही केलेला नाही.)